# चित्पावन मोडक- विनोद कुटुंबियांचे कुलसंमेलन-२०१८

चित्पावन मोडक आणि विनोद कुटुंबीय आणि त्यांच्या माहेरवाशिणी यांचे दोन दिवसांचे संमेलन पुणे येथील स्वामी कृपा हॉल येथे दिनांक ८ आणि ९ डिसेंबर २०१८ रोजी थाटात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस गेल्या वर्षभरात निधन पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण केली गेली.

श्री परशुराम यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. चिरंजीव ध्रुव, कुमारी धृती आणि केतकी यांनी विश्वप्रार्थना तसेच कुमारी रमा आणि रेवा मोडक यांनी गणेश वंदना सादर केली. संमेलनाच्या उद्घाटनाच्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मोडक कुटुंबीयांपैकी मेजर जनरल (निवृत्त) श्री प्रभाकर मोडक होते. चित्पावन मोडक कुलन्यासाचे अध्यक्ष माननीय श्री श्रीधर मोडक यांनी संमेलनाचे प्रास्ताविक केले. आत्तापावेतो झालेल्या संमेलनाचा आढावा घेउन या संमेलनाचे प्रयोजन आणि न्यासाचे कार्य थोडक्यात विशद केले. हे संमेलन सर्व स्त्रीवर्गाने आयोजित केल्याचा विशेष गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांनी याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

गेल्या काही वर्षात कुटुंबातील व्यक्तींनी वेगवेगळ्या क्षेत्रात जे यश संपादन केले अशा १३ व्यक्तींच्या कार्याचा, उपलब्धींचा परिचय देऊन त्यांचे खास अभिनंदन करण्यात आले. यामध्ये खालील कुलबांधव आणि भगिनींचा समावेश होता.

| क्र. | नाव | प्रावीण्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | चि. अथर्व ह्रृषीकेश | "वुशू"- चिनी मार्शल आर्ट |
| २ | कु. अंकिता शैलेश | जपानी भाषा, स्टुडीओ |
| ३ | कु. मृदुल अनिल | धनुर्विद्या (Archery) |
| ४ | तेजस मोडक | ॲनिमेशन, ग्राफिक नॉव्हेल, कला दिग्दर्शन, पटकथा, संवाद, गीतकार |
| ५ | डॉ. क्षितिजा राहुल सोमण (क्षितिजा विश्वास मोडक) | फोरेन्सिक ऑडीट |
| ६ | श्री चैतन्य मिलिंद | वायुसेना मेडल |
| ७ | श्री वैभव गणेश | प्रगतशील शेतकरी, संशोधक, दाबयुक्त सेंद्रिय खत निर्मिती ई. |
| ८ | कर्नल पराग उदय | सेनादलातील विशेष कार्य |
| ९ | डॉ. अभिजित उदय | वैद्यकीय |

| क्र. | नाव | प्रावीण्यक्षेत्र |
|---|---|---|
| १० | डॉ. गिरीश मोडक | मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधील डॉक्टरेट |
| ११ | डॉ. मिलिंद मोडक | प्राईड ऑफ महाराष्ट्र मंडळ |
| १२ | श्री दीपक मोडक | कोयना प्रकल्पातील विशेष योगदान |
| १३ | डॉ अशोक गजानन | नॅशनल रिसर्च प्रोफेसर आणि मध्य प्रदेशच्या केंद्रीय विश्वविद्यालयावर कुलपती म्हणून नियुक्ती |

गेल्या वर्षी दहावी आणि बारावी परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या कुमारी मुग्धा योगेश, स्वानंद पंकज, सिद्धार्थ संजय आणि सायली सतीश या विद्यार्थ्यांना न्यासातर्फे पारितोषिके वितरित केली गेली.

मोडक आणि विनोद कुटुंबियांमधील काही ज्येष्ठ व्यक्तींचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला यामध्ये खालील कुलबांधव आणि भगिनींचा समावेश होता

(१) श्री प्रभाकर तथा बाळासाहेब मोडक

(२) श्रीमती नलूताई मोडक

(३) डॉक्टर ज्योती मोडक रत्नपारखी क्रो

(४) श्री चंद्रशेखर मोडक,

(५) श्री अनिल गंगाधर मोडक

(६) श्री रमेश मोडक

त्यानंतर मेजर जनरल मोडक यांचे मार्गदर्शनपर अध्यक्षीय भाषण झाले. युवकांनी लष्करा मधील करिअरसाठी जरूर प्रयत्न करावेत असा मोलाच सल्ला त्यांनी युवकांना दिला तसेच अशा प्रकारच्या संमेलनांची अत्यंत आवश्यकता असल्याचे विशद करून न्यासाच्या उद्दिष्टांसाठी सर्व कुटुंबियांनी सर्वतोपरी मदत करावी असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले.

उद्घाटनाच्या दिमाखदार कार्यक्रमानंतर इंटरॅक्टिव्ह गेम्स या खेळामध्ये आबाल वृद्धांनी खेळीमेळीने भाग घेतला. वेगवेगळ्या शहरात कार्यरत असलेल्या मोडक कुलप्रतिनिधींची बैठक झाली.

भोजनोत्तर श्री बंडा जोशी यांचा हास्यपंचमी ह्या मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा आनंद सर्वांनी लुटला. कॉफी पानानंतर पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

रविवार दिनांक ९ रोजी सकाळी सात वाजता माननीय डॉ संप्रसादजी विनोद यांचे सर्वांगीण आरोग्यासाठी योग साधना या विषयावर मार्गदर्शन लाभले आणि सर्वांनी मनाच्या प्रसन्नतेचा सुंदर अनुभव घेतला. त्यानंतर डॉक्टर योगेश गुर्जर यांचा “सल्तनत” हा जेनेटिक्स या विषयावरच्या त्यांच्या संशोधनावर आधारित एक अत्यंत सुरेख कार्यक्रम झाला. अतिशय क्लिष्ट विषय त्यांनी अगदी सोप्या भाषेत समजावून दिला, सर्वांच्या शंकांचे निरसनही केले. आपले शारीरिक, बौद्धिक व मानसिक गुणविशेष यावर आनुवंशिकतेचा प्रभाव कसा आणि किती हे त्यांनी वेगवेगळी उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

श्री दीपक मोडक, जे कोयना धरणाच्या लेक टॅपिंगच्या यशस्वी प्रयोगासाठी प्रसिध्द आहेत, ते एक चांगले लेखकही आहेत. त्यांनी दृक्श्राव्य माध्यमातून आपली एक कथा सादर केली आणि त्यांच्या या वेगळ्या पैलूचा परिचय दिला.

यानंतर मोडक कुटुंबीयांपैकीच एक आणि जिच्या कार्यक्रमांचे, मुलाखतींचे व्हिडिओज सध्या अतिशय लोकप्रिय आहेत अशा कुमारी अनघा मोडक हिने संवाद कौशल्य हा विषय आपल्या परिपूर्ण अभ्यासाने आणि ओघवत्या भाषेने सर्वांच्या हृदयापर्यंत पोहोचविला. प्रतिकूल परिस्थितीतही सकारात्मक विचार कसा करावा त्याचा आदर्शच तिने आपल्या आचरणाने निर्माण केला आहे. तिचे भाषेवरील प्रभुत्वही सर्वांनाच मंत्रमुग्ध करून गेले.

भोजनोत्तर श्रीमती स्वाती मोडक लोंढे यांचे कथाकथन झाले. त्यांनी स्वतःचीच एक वेगळ्या विषयावरील कथा सादर केली.

मोडक विनोद यांची एकूण २९ घराणी आहेत. उपस्थित मंडळीपैकी आपापल्या घराण्यातील मंडळी एकत्र जमली आणि त्या प्रत्येक घराण्यातील व्यक्तींचे स्वतंत्र फोटो काढले गेले.

मोडक विनोद घराण्यातील माहेरवाशिणीं या संमेलनास अगत्याने उपस्थित होत्या; त्या सर्वांचा सन्मान या प्रसंगी केला गेला.

कुलसंमेलनाचा वृत्तांत संपवताना एक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही आणि तो म्हणजे

सौ वीणा मोडक यांनी २ दिवस सहजतेने आणि वेळेचे भान राखून पार पाडलेली सूत्रसंचालनाची जबाबदारी ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रम ठरल्याप्रमाणे संपन्न झाला

कॉफीपानानंतर दोन दिवस चाललेल्या या हृद्य कौटुंबिक सोहोळ्याची सांगता आभारप्रदर्शन आणि शेवटी वासवदत्ता मोडक यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

या संमेलनास केवळ पुण्या-मुंबईतीलच नव्हे तर थेट इंदोर-भोपाळ, रत्नागिरी, नंदुरबार, बेळगाव अशा दूरदूरच्या गावांहून मोडक विनोद कुटुंबीय जमले होते.